केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या घटकांकरीता मार्जिन मनी उपलब्ध करुन देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मासाका २०१८/प्र.क्र.२५९ (२)/अजाक,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,**
**मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२**
**दिनांक :- ०८ मार्च, २०१९**

**प्रस्तावना -**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंतीवर्ष भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन मोठया प्रमाणात साजरे करीत असताना यामध्ये केंद्र शासनाने २०१५ मध्ये स्टँड अप इंडीया ही योजना घोषित केली आहे. या योजनेमध्ये १.२५ लाख अनुसूचित जाती/जमातीचे उद्योजक आणि १.२५ लाख महिला उद्योजिका आगामी ३ वर्षात निर्माण करण्याचे उद्दिष्ट केंद्र शासनाने ठरविलेले आहे. देशातील २७ सरकारी बँकांच्या १.२५ लाख शाखांच्या माध्यमातून १.२५ लाख अनुसूचित जाती/ जमातीचे उद्योजक आणि १.२५ लाख महिला उद्योजिका बनविण्याची जबाबदारी प्रत्येक बँकेच्या शाखेवर सोपविण्यात आली आहे. यासाठी केंद्र शासनाने १० हजार कोटींची तरतुद केली असून सदर रक्कम सिडबी कडे वर्ग करण्यात आली आहे. सिडबीने या रकमेचे सुरक्षा हमी कवच तयार केले असून लाभार्थ्यांना जे कर्ज दिले जाईल त्याला सिडबी हमी देईल. सदर योजनेंतर्गत संबंधित लाभार्थी यांनी त्यांचा स्वहिस्सा म्हणून एकूण प्रकल्प किंमतीच्या २५ % रक्कम द्यावयाची आहे. त्यानुसार राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील सवलतीस पात्र नवउद्योजक लाभार्थी यांना त्यांच्या एकूण प्रकल्प किंमतीच्या स्वहिस्सा २५ % रक्कमेपैकी जास्तीत जास्त १५ % मार्जीन मनी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या सवलती घेण्यास पात्र असलेला अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नवउद्योजक लाभार्थ्यांची मार्जिन मनी भरण्याची क्षमता नसल्यामुळे या नवउद्योजक लाभार्थ्यांना एकूण प्रकल्प किंमतीच्या लाभार्थी यांच्या हिश्श्यामधील २५% मधील जास्तीत जास्त १५% मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्यास (front end subsidy) याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीसाठीच्या सवलती घेण्यास पात्र असलेला अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील नवउद्योजक यांनी १० % स्वहिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टॅड अप इंडीया योजनेंतर्गत ७५ % कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरीत front end subsidy १५ % राज्यशासनामार्फत देण्यात येईल.

१.१ सदर योजनेचा लाभ स्टँडअप इंडीया योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या राज्यातील अनुसूचित जाती तथा नवबौध्द सवलतीस पात्र लाभार्थ्यांना देण्यात येईल.

१.२ संबंधित लाभार्थ्याने आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचे नावे अनुदानासाठी मागणीपत्र परिशिष्ट "अ" येथे विहीत केलेल्या विवरणपत्रात सादर करणे आवश्यक आहे. पत्रासोबत उद्योग आधार नोंदणी पत्र आणि जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१.३ बँकेचे कर्ज मंजुरीचे पत्र आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांना सादर करणे आवश्यक आहे.

१.४ सदरची सबसीडी रक्कम आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांनी ०७ दिवसांचे आत लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यामध्ये NEFT/RTGS च्या माध्यमातून पाठवावी.

२. यासाठी आयुक्त, समाजकल्याण,पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोपित करण्यात येत आहे.

३. या योजनेसाठी मा.महालेखापालांच्या मंजुरीने स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात येईल.

४. तसेच, या योजनेचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी प्रधान सचिव ( सामाजिक न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येईल. या समितीमध्ये सचिव (उद्योग) तसेच, सिडबी (SIDBI), DICCI चे प्रतिनिधी यांचा समावेश असेल.

५. सदर शासन निर्णय,मंत्रीमंडळाच्या दिनांक २९ जानेवारी,२०१९ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत असून तो महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०३०८१६४३२१६२२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

DINGLE DINESH RAMCHANDRA

Digitally signed by DINGLE DINESH RAMCHANDRA
DN: CN = DINGLE DINESH RAMCHANDRA, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPECIAL JUSTICE DEPT
Date: 2019.03.10 18:08:28 +05'30'

**(दि.रा.डिंगळे)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१) अ.मु.स.(वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) अ.मु.स.(उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेप सहाय्यक विभाग ,मंत्रालय,मुंबई
४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई,
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र, नागपूर.
७) महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई.
८) महालेखापाल (लेखापरिक्षा) - २, , महाराष्ट्र, नागपूर.
९) संचालक, लेखा व कोपागरे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०) सर्व प्रादेशिक उप आयुक्त, समाजकल्याण विभाग.
११) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग,

१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३) कोपागार अधिकारी, पुणे.
१४) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प/विघयो), सामाजिक न्याय व विशेप सहाय्यक विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) निवड नस्ती /अजाक.